महाराष्ट्र शासन
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र मुंबई
जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१,२,५ व ६, हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनरासमोर, मुंबई-४०० ००१
☎ ०२२-२२०५७४०९ / २२०७२०९७ E-mail :mah-sforum@nic.in Website :https://grahak.maharashtra.gov.in/

---

जा.क्र.राआ/आस्था-५/पीठ संरचना/ २०२१/ ३८४९ दिनांक : १२.११.२०२१

---

वाचा : राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे परिपत्रक क्र.SC/Legal/Bench/2016/1317 dtd.30.03.2016

## -: परिपत्रक :-

ज्याअर्थी राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई येथील ग्राहक प्रकरणे तातडीने निकाली काढणे गरजेचे असल्याने उपरोक्त् संदर्भीय परिपत्रकानुसार राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, समोरील अंतिम सुनावणीपुर्वीचे कामकाज प्रबंधक विधी, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग यांचेसमोर चालवण्याबाबत निश्चित करण्यात आले होते. तथापि प्रबंधक विधी राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग यांचेकडील इतर कामकाजामुळे अंतिम सुनावणीपुर्वीचे वरील कामकाज स्थगित करण्यात आले होते.

याव्दारे राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई समोर उपस्थित राहणा-या सर्व वकील वर्गांना तसेच उभय पक्षकार व अधिकृत प्रतिनिधींना कळविण्यात येते की, न्यायिक कामकाजाचा वेळेचा अपव्यय होऊ नये म्हणून दिनांक ३०.०३.२०१६ च्या परिपत्रकामधील मुद्दा क्र.४ वगळून, नमूद केलेले कामकाज सोमवार दिनांक १५ नोव्हेंबर २०२१ पासून पूढील आदेशापर्यंत प्रबंधक विधी, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग महाराष्ट्र, मुंबई यांचेसमोर चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(स्वाक्षरी)

( डॉ.एस.के.काकडे )
प्रभारी अध्यक्ष,
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,
महाराष्ट्र, मुंबई

प्रत माहितीसाठी

१. प्रबंधक विधी, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, खंडपीठ मुंबई/नागपूर/औरंगाबाद
२. प्रबंधक प्रशासन, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग
३.सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग.
४. नोटीस बोर्डवर प्रदर्शित करण्यासाठी.
५. राज्य आयोग वकील संघाच्या नोटीस बोर्डसाठी.